उद्याचा मराठवाडा दि. १५/10/2022,

# राज्यपालांच्या हस्ते पो.नि.धबडगे यांना राष्ट्रपती पोलीस पदक

नांदेड (प्रतिनिधी) – पोलीस दलात गेल्या ३५ वर्षांपासून सेवा बजावणारे पोलीस निरीक्षक भगवान धबडगे यांना आज राजभवनात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले आहे.

गेल्या ३५ वर्षांपूर्वी भगवान धबडगे हे पोलीस दलात रूजू झाले होते. प्रामाणिक आणि आपल्या नोकरीशी इमान बाळगून काम करणाऱ्या भगवान धबडगे यांना पदोन्नतीवर पोलीस निरीक्षक पदापर्यंत पोहोचता आले. सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी काम करतांना पोलिसांची प्रतिमा मलीन होणार नाही, याची खबरदारी घेत त्यांनी कायद्याचे रक्षण केले आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, सामाजिक सलोखा जपण्यासाठी, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सर्वोत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना सन २०२१ चे राष्ट्रपती पोलीस पदक घोषित झाले होते.



राज्यपाल भगतसिंक कोश्यारी यांच्या हस्ते आज मुंबई येथे राजभवनात पो.नि. भगवान धबडगे यांना राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले आहे. याबद्दल पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पो.नि. धबडगे यांचे अभिनंदन केले आहे.